**सहसंचालक (उच्च शिक्षण)**
**१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१**
**Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com**

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

जा.क्र.ससं/उशि/पुवि/अल्पसंख्याक बैठक/२०११-१२/ 2120 दिनांक ९.९.२०११

प्रति,

**(अत्यंत महत्वाचे)**

१. उपसंचालक, उच्च माध्यमिक विभाग (११ वी, १२ वी अध्यापक विद्यालये), पुणे, नाशिक.
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण (तंत्र निकेतर पदविका), पुणे विभाग, पुणे,
३. उपसंचालक, व्यवसाय व प्रशिक्षण (आय.टी.आय. एम.सी.व्ही.सी., उच्च माध्यमिक)पुणे, नाशिक
४. महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, (कृषी महाविद्यालये व कृषी पदविकास विद्यालये)
५. प्रबंधक, नर्सिंग (पदविका अभ्यासक्रमाची विद्यालये)
६. संचालक, वैद्यकीय शिक्षण (पदविका कोर्सेस)
७. कुलसचिव, अकृषी/कृषी विद्यापीठे/पशुविज्ञान/आरोग्य विज्ञान/मुक्त विद्यापीठे.

**विषय- अल्पसंख्याक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०११-१२.**

संदर्भ- १. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि. २६.८.२०११ रोजी घेतलेल्या बैठकीच्या इतिवृत्ताची अंमलबजावणी करणे.
२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र. उशिसं/अल्पसंख्याक शिष्य/२०११/१४ अई दि. २७.८.२०११.

महोदय,

आपणास विदितच आहे की, सन २००७-०८ या आर्थिक वर्षापासून मा. प्रधान मंत्री यांच्या १५ कलमी कार्यक्रमा अंतर्गत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येत आहे. त्यानुसार सन २०११-१२ या वर्षासाठी सुध्दा ही योजना राबविण्यात येत आहे. या योजने बाबतच्या माहिती सविस्तर जाहिरात तसेच अर्ज करण्याची पध्दती याबाबत राज्यातील प्रमुख वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात आलेली आहे. या शिष्यवृत्ती अंतर्गत ११ वी १२ वी, एम.सी.व्ही.सी. तसेच सर्व प्रकारचे डीप्लोमा कोर्सेस, पदवी व पदव्युत्तर शिक्षण, एम.फील, पीएच.डी. तसेच आयटीआय व एनसीटीव्हीटी यामधील विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावयाचा आहे. याबाबतची माहिती विद्यार्थ्यांना पूर्णपणे उपलब्ध होण्यासाठी या कार्यालयाने **दिनांक १३ सप्टेंबर २०११ रोजी नौरोसजी वाडीया महाविद्यालय, पुणे येथील टाटा असेम्ब्ली हॉलमध्ये**

**१. सकाळी १०.०० ते १२.०० पुणे जिल्हा.**
**२. दुपारी ०१.०० ते ०३.०० अहमदनगर जिल्हा**
**३. सायंकाळी ०४.०० ते ०६.०० नाशिक जिल्हा.** या जिल्हयांमधील कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये / तंत्रशाळा / तंत्रनिकेतने/ कृषी/अकृषी विद्यापीठे / अभिमत विद्यापीठे यांची बैठक आयोजित केलेली आहे. या बैठकीमध्ये विद्यार्थ्यांनी अर्ज करावयाची पध्दती तसेच महाविद्यालयाने या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांकडून आलेल्या अर्जावर करावयाच्या कार्यवाहीची माहिती याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तरी आपणास या पत्राद्वारे विनंती करण्यात येते की, आपल्या कार्यकक्षेतील पुणे / अहदमनगर व नाशिक या जिल्हयामधील संबंधितांना या बैठकीसाठी उपस्थित राहण्याबाबतच्या योग्य त्या सूचना तात्काळ निर्गमित कराव्यात व तसे या कार्यालयास कळविण्यात यावे ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. म.मा. कडू)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

जा.क्र. तंशिविकापु/विवि/मायनॉरीटी/२०११-१२/ 6420

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दिनांक :- १२/०९/२०११

12 SEP 2011

प्रत :- सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित पदविका संस्थांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

(डि.एन. शिंगाडे )
प्र. सहसंचालक,